पुणे, शुक्रवार, १४ जून २०२४ ■ पाने १२ किंमत ₹ ६

NiE NEWSPAPER IN EDUCATION

सकाळ

# आनंदाची रिमझिम

**महाराष्ट्राचे चेरापुंजी :** महाराष्ट्रात सर्वांत जास्त पाऊस अंबोली येथे पडतो. अंबोली हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातले गाव. सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेल्या या गावाची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे २१०० मीटर असून येथे वर्षाला साधारणपणे ७४७० मिलिमीटर इतका पाऊस पडतो. अंबोलीला महाराष्ट्राचे चेरापुंजीदेखील म्हटले जाते.

**पाऊस कसा मोजतात ? :** पुण्यात अमुक मिलिमीटर पाऊस पडला. मुंबईत तमुक मिलिमीटर पाऊस पडला अशा बातम्या आपण वाचतो. पण, हा नेमका पाऊस कसा मोजतात याचा विचार केलाय ? खरं तर पावसाचं प्रमाण मोजण्यासाठी पर्जन्यमापक यंत्राचा वापर केला जातो. लिटर प्रति चौरस मीटर किंवा मिलिमीटर हे एकक वापरून पाऊस मोजला जातो. यात मेट्रिक पद्धतीत मिलिमीटर तर ब्रिटिश पद्धतीत इंच हेदेखील एकक वापरले जाते. आता पाऊस मोजण्यासाठीही वेगवेगळी यंत्र आहेत.

## पावसाची गोष्ट

एकदा काय झालं, एका गावावर दोन छोटे छोटे ढग तरंगत होते. एक होता काळा आणि एक होता पांढरा. काळा ढग नाराज होऊन गावाकडं बघत होता. पांढरा ढग मात्र भलताच खूष होता. आपण पांढरेशुभ्र आहोत याचा त्याला मोठा अभिमान वाटत होता.

* * *

दोन्ही ढग डोंगराच्या दिशेने निघाले. पांढरा ढग म्हणाला, 'तुला तुझ्या काळ्या रंगाची लाज नाही वाटत का?असं वाटतंय जणू आभाळात तरंगणाऱ्या कोळशाचा ढीग आहेस तू.' असं म्हणून पांढरा ढग मोठमोठ्याने हसू लागला. काळा ढग मात्र नाराज झाला. 'आपण खरोखरच इतकं कुरूप दिसतो का? असा विचार त्याच्या डोक्यात येऊ लागला. इतक्यात समोरच्या डोंगरापलिकडं विजा चमकू लागल्या. गडगडाट होऊ लागला. दोन्ही ढग डोंगराकडे बघू लागले. त्यांना आपल्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता. कारण डोंगरापलिकडच्या समुद्रावरून हजारो काळे ढग रुबाबात येत होते. हत्तीएवढ्या आकाराचे सगळे ढग डोंगर ओलांडून या दोन्ही ढगांजवळ आले. त्या मोठ्या ढगांमधला एक ढग म्हणाला, 'चला बाळांनो आपल्याला महत्त्वाचं काम करायचं आहे.'

काळा ढग म्हणाला, 'कसलं काम काका?'

मोठा ढग म्हणाला, 'आपल्याला या पृथ्वीला सुजलाम् सुफलाम् करायचं आहे. आम्ही समुद्रातून पाणी आणलं आहे. त्यामुळंच तर आम्ही सर्वजण काळे झालो आहोत. आपल्याला मुसळधार बरसायचं आहे. चला आमच्यासोबत चला.'

तसा काळा ढग हसत म्हणाला, 'म्हणजे मीही पाण्याचा ढग आहे का? म्हणजे शेतकरी, पक्षी, प्राणी, वनस्पती मला पाहून आनंदित होतात का ?'

मोठा ढग स्मित करत म्हणाला, 'होय बाळा.'


मोठ्या ढगाचं उत्तर ऐकताच काळा ढग हसू लागला. पांढरा ढग मात्र खजिल झाला. त्याला आपली चुक लक्षात आली होती. मोठ्या ढगाने पांढऱ्या ढगाच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवला आणि क्षणात पांढरा ढगही काळाकुट्ट झाला. पाण्याने तुडूंब भरला. सगळे ढग एकदम खूष झाले आणि मोठ्या आनंदाने बरसण्यासाठी निघाले.

## दगडाचे जुने पर्जन्यमापक

पूर्वी पाऊस मोजण्यासाठी दगडापासून पर्जन्यमापक यंत्र तयार केले जाई. तीन फूट व्यासाचा आणि दहा फूट उंचीचा दगड तयार केला जात असे. वरच्या बाजूला उखळासारखा आकार दिला जात असे. उखळासारख्या या आकाराच्या तळाशी एक छिद्र असे. हे छिद्र चिखल व लाकडी पट्टी लावून बंद केले जाई. पाऊस पडत असताना या वर्तुळाकार तोंडातून पाणी आत जाई. या साठलेल्या पावसाच्या पाण्याचे दैनंदिन किंवा साप्ताहिक मोजमाप केले जाई.

## पावसाचे थेंब कसे तयार होतात?

वाफेचे अथवा बाष्पाचे ढग तयार होतात, हे तर आपल्याला माहिती आहेच. याच ढगांमधील बाष्पाचे अथवा वाफेचे द्रवीभवन होऊन पृथ्वीवर पाण्याचे थेंब पडू लागतात. द्रवीभवन म्हणजे थंड हवा लागल्याने वाफेचे पाणी होणे होय. तर थंड हवा लागल्याने किंवा आर्द्रतेचे प्रमाण वाढल्याने सर्व ढगांचे पाणी होते आणि पृथ्वीवर पाऊस पडतो.



# आणि समोर वाघ आला!



मुलांनो, माझ्या आयुष्यात घडलेली एक खरी गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे. श्रावण महिन्यातील ही गोष्ट आहे. पावसाचे दिवस होते. गावाकडे महत्त्वाचे काम असल्यामुळे आम्ही शनिवारी दुपारी गावी जायचे ठरवले. दुपारी २.३० वाजता आम्ही आमच्या नवीन मोटारसायकलवर गावाला जायला निघालो. मी, माझी मुलगी सायली आणि तिचे वडील असे तिघे जण गाडीवर बसून निघालो. गाडी नवीन असल्यामुळे पहिल्यांदाच गाडीवर गावाला जाताना खूप छान वाटत होतं.

आमचं गाव पुण्यापासून जवळच म्हणजे अडीच-तीन तासांच्या अंतरावर होतं. त्यामुळे आम्हाला असं वाटलं होतं की संध्याकाळी सहापर्यंत आम्ही घरी पोहोचू. पावसाळ्याचे दिवस असले, तरी त्या दिवशी बाहेर ऊन पडलं होतं. पावसाचं कोणतंच चिन्ह नव्हतं. तरीही आम्ही रेनकोट घेऊन निघालो होतो.

रस्त्याच्या कडेने दिसणारी छान हिरवीगार झाडी व डोंगर बघत, गाणी म्हणत आमचा प्रवास छान सुरू होता. रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्या बघताना सायलीला खूप मजा वाटत होती. रस्त्यावरील दुकाने पाहून तिने हट्ट धरला, की आपण वडापाव खायला थांबूया. संध्याकाळचे चार वाजले होते. सायलीला वडापाव खूप आवडतो आणि आम्हालाही थोडी भूक लागली होती. अर्ध्या तासात खाऊन आपण पुढे जाऊया असा विचार करून आम्ही एका हॉटेलमध्ये थांबलो. तिथे गरमागरम वडापाव खाऊन व चहा पिऊन आम्हाला खूप भारी वाटलं. सायली तर काय उड्याच मारत होती. आम्ही हॉटेलमधून बाहेर पडत असतानाच आभाळ भरून आलं म्हणून आम्ही थोडं थांबलो आणि पुढच्या दहा मिनिटांत जोरदार पाऊस पडायला सुरुवात झाली. आता काय करावं? असा प्रश्न आम्हाला पडला. पाऊस कमी झाल्यावर पुढे जाऊया, असा विचार करून परत बसून राहिलो. परंतु, पाऊस थांबायचं काही चिन्ह दिसेना. मग आम्ही रेनकोट घातले आणि निघालो.

आम्ही पाऊस अंगावर घेत जात होतो. पावसामुळे पुढचा रस्ता नीट दिसत नव्हता. गाडी सावकाश चालवावी लागत होती. अचानक गाडी बंद पडली, तर काय करायचं असा विचार मनात येत होता. पावसाळ्याच्या दिवसात अंधार लवकर पडतो. त्या दिवशी तसंच झालं होतं. अर्ध्या तासाच्या अंतरावर आमचं गाव आलं असताना काळाकुट्ट अंधार पडला. अंधारात आणि पावसात भिजत गाडीवर जाण्याचा हा माझा पहिलाच अनुभव होता. त्यामुळे त्या अंधारात गाडीवर बसून पावसात भिजत गावाला जाताना मला तर खूपच भीती वाटत होती. इतक्यात अचानक आमची गाडी थांबली आणि मी समोर बघते तर एक वाघ रस्त्यात उभा होता. अंधारात त्याचे लाल डोळे चमकत होते. आता काय करायचं? क्षणभर काहीच सुचेना. पुढे जावं की मागं? आमच्या तोंडचं पाणीच पळालं. आम्ही कोणताच आवाज न करता शांतपणे गाडी बंद केली आणि लाइट सुरूच ठेवला. मनातल्या मनात हा वाघ लवकर इथून निघून जावा म्हणून आम्ही प्रार्थना करत होतो.

पाच मिनिटांनंतर तो वाघ तिथून निघून गेला आणि आमचा जीव भांड्यात पडला. देवाचं नाव घेत आम्ही लवकरच घरी पोहोचलो. घरी गेल्यावर कपडे वगैरे बदलून जेवण झाल्यानंतर घरातल्यांना हा प्रसंग सांगितल्यावर सासूबाई म्हणाल्या, 'देवाने तुमचं रक्षण केलं, पण इथून पुढे असं रात्रीच्या वेळी गाडीवरून तुम्ही तिघेही येत जाऊ नका.'

आम्ही पुन्हा परमेश्वराचे आभार मानले. त्यानंतर संध्याकाळी सहानंतर गाडीवरून गावाला जायचं नाही, असं आम्ही ठरवलं.

**- मीना दीक्षित, शिक्षिका,**
ज्ञानप्रबोधिनी निगडी, पुणे

# इंधन वापरा जपून

पृथ्वीवर ऊर्जेचे वेगवेगळे स्रोत अस्तित्वात आहेत. यातील काही स्रोत पारंपरिक, तर काही अपारंपरिक आहेत. पारंपरिक स्रोतांमध्ये कोळसा, पेट्रोल, डिझेल इत्यादींचा समावेश होतो. तर सूर्यप्रकाश, हवा हे ऊर्जेचे अपारंपरिक स्रोत. या सर्वांमध्ये महत्त्वाचे नैसर्गिक खनिज म्हणजे पेट्रोल आणि डिझेल होय. कारण यांच्यामुळेच आपल्याला आपली वाहने चालवण्यात मदत मिळते. मनुष्य शेकडो वर्षांपासून पेट्रोलचा उपयोग करत आला आहे, परंतु पेट्रोल हा पारंपारिक स्रोत असल्याने येत्या काळात ते संपुष्टात येईल आणि मग पेट्रोल संपले, तर आपले काय होईल? आपली वाहने कशी चालणार? आपण एका गावाहून दुसऱ्या गावाला कसे जाणार?

शास्त्रज्ञांनुसार सन २०८० नंतर जगातील पेट्रोल-डिझेलचा पुरवठा खूप कमी होईल. आज पेट्रोल हे मानवी जीवनाचा एक महत्त्वपूर्ण भाग बनले आहे आणि पेट्रोलशिवाय सरळ जीवनाची कल्पना करणेदेखील कठीण आहे. पेट्रोल संपल्याने संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था खालावेल. आजकाल जगातील सर्वाधिक प्रवास, एका देशातून दुसऱ्या देशात वस्तूंची देवाणघेवाण ट्रक, रेल्वे, विमान, जहाज इत्यादी वाहतुकीच्या साधनांद्वारे केली जाते. परंतु, पेट्रोल आणि डिझेल संपल्याने ही सर्व वाहने चालणार नाहीत. त्यामुळे कोणत्याही देशातून आयात-निर्यात होणार नाही. परिणामी विदेशी व्यापार ठप्प पडतील. आपल्याला आपली शाळा, बाग, मंदिर अशा ठिकाणी जाणेही अवघड होईल. या सर्व गोष्टींचा विचार करून आपण इंधनाची बचत करणं आणि त्यांचा काटेकोर वापर करणं आवश्यक आहे.



**- रमा जाधव,**
सिल्लोड

# शाळा सुरू होताना!



दोस्तांनो, आपली शाळा आता सुरू होते आहे. शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येकासाठी वेगळा असतो. मात्र, काही जणांना तो नकोसा वाटतो. मित्र-मैत्रिणींनो शाळेच्या पहिल्या दिवशी आपण खूप उत्साहाने जायला हवे. तसं झालं तर आपलं संपूर्ण वर्ष उत्साहात जाईल. पहिल्या दिवशी नवं दप्तर, नवा गणवेश, नव्या वह्या आणि पुस्तके अशा सर्व गोष्टी नव्या असतात. त्यामुळे तुम्ही या सर्व वस्तूंचा आनंद घेत छान हसत शाळेत जा. पहिल्या दिवशी तुम्ही नव्या वर्गात बसाल. नवा वर्ग, नवा बाक आणि शिक्षकही नवे असतील. त्यांच्याशी छान जुळवून घ्या. भरपूर अभ्यास करा आणि छान खेळासुद्धा. मलाही खेळायला खूप आवडते. मात्र, माझी आई मला अभ्यासाच्या सूचना देते आणि त्यामुळे माझा अभ्यासही पूर्ण होतो. अशाच प्रकारे तुम्हीदेखील छान मजा करा आणि अभ्यासही करा. तुम्हा सर्वांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या खूप शुभेच्छा!

**- प्रणिल मोहिते,** इचलकरंजी





**स्वस्ति स्वप्निल चिंचकर,** तिसरी
हेलीऑस इंटरनॅशनल स्कुल, पुणे





**वृंदा चौधरी,**
सेंट हेलेनाज स्कूल, पुणे






**ओंकार कारदी,** सातवी
साधना हायस्कूल, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

# असू द्या थोडा ठामपणा!

**दोस्तांनो, स्वतःच्या निर्णयावर ठाम राहा. त्यात सतत बदल करू नका. जे ठरवाल, ते पूर्ण करा. अशा आशयाची अनेक वाक्यं तुमच्या कानावर पडत असतीलच ना? आई-बाबा किंवा शाळेत शिक्षकही तुम्हाला ठाम राहण्याबाबत सांगत असतील. मग ठाम राहणं म्हणजे काय? त्यामुळे काय साध्य होऊ शकतं? ठाम राहणं का आवश्यक असतं? हे आपण जाणून घेऊया. त्यामुळे तुम्हालाही या गोष्टीचं महत्त्व लक्षात येईल.**

## योग्य-अयोग्यची ओळख

मित्र-मैत्रिणींनो, आपल्याला नेमकं कोणत्या गोष्टीवर ठाम राहायचं आहे, हे ठरवणं जास्त महत्त्वाचं असतं. कारण, चुकीच्या निर्णयावर तुम्ही ठाम राहिलात, तर नुकसान तुमचंच आहे. त्यामुळे आपल्यासाठी काय योग्य आहे, हे आधी ठरवा. त्यासाठी हवं तर मोठ्यांची मदत घ्या. विचार करून योग्य तो निर्णय घेऊन मग त्यावर ठाम राहा. उदा. - परीक्षा जवळ आली असताना अभ्यास करायचाच नाही यावर तुम्ही ठाम राहिलात, तर ते चुकीचं आहे. मात्र, रोज व्यायाम करण्याचा निर्णय घेऊन तुम्ही त्याचं काटेकोर पालन केलं नाही, तर त्यात तुमचं नुकसानच आहे.



## स्वतःशी संवाद

एखाद्या वेळी नक्की काय करू ते कळत नाही. कोणती गोष्ट महत्त्वाची आहे? प्राधान्य कशाला द्यायला हवं? कोणाची बाजू बरोबर आहे? यात गोंधळ उडतो. तुम्हीदेखील मित्रांचं ऐकावं की, आई-बाबांचं ऐकावं या गोंधळात अडकता आणि मग काही तरी चुकीचं ठरवता. अशा वेळी तुम्हाला स्वतःला काय वाटतं, यावर ठाम राहणं आवश्यक असतं. तुम्हाला जे मनापासून करावसं वाटतं त्याचा शांतपणे विचार करा, मनाशी पक्कं करा आणि मग त्यात बदल करू नका.

> दोस्तांनो, एखाद्या गोष्टीवर ठाम राहिल्याने आणखी काय काय फायदे होतात हे जाणून घ्यायचं असेल, तर तुम्ही 'स्टिक अप फॉर मायसेल्फ' नावाचे पुस्तक नक्की वाचा.

## ठामपणा म्हणजे...

ठाम राहणं म्हणजे रूक्षता, इतरांचा विचार न करणं, स्वार्थी होणं किंवा केवळ स्वतःचाच विचार करणं असं काही लोकांना वाटू शकतं. मात्र, ठाम राहणं म्हणजे इतरांना आपल्यापासून तोडणं असं नसून स्वतःच्या निर्णयाची पूर्ण अंमलबजावणी करणं असा त्याचा अर्थ होतो. त्यामुळे तुम्ही एखाद्या निर्णयावर ठाम आहात याचा अर्थ तुम्ही इतरांचं ऐकत नाही असा होत नाही. तुम्हाला असं कोणी बोलल्यास तुम्ही त्या व्यक्तीला समजावून सांगा.

## सातत्याचा ध्यास

तुम्ही जे काही ठरवाल त्यात सातत्य हवं. ठामपणा ही केवळ बोलण्याची गोष्ट नाही, तर ती करून दाखवण्याची बाब आहे. त्यामुळे तुम्ही जे ठरवाल त्यात सातत्य ठेवा. ठाम राहिल्यावरच सातत्य राखता येतं आणि सातत्य नसेल, तर ठाम राहून काही उपयोग नाही. आपण पुन्हा वरील उदाहरण घेऊया. तुम्ही रोज व्यायाम करायचं असं ठरवून त्यावर ठाम राहिलात, पण प्रत्यक्षात कृती केलीच नाही, तर त्याचा काहीच उपयोग नाही. अशा वेळी तुमची लोक चेष्टाही करू शकतात. त्यामुळे स्वतःच्या निर्णयावर ठाम राहा आणि त्यात सातत्य ठेवा.

# शिवराज्याभिषेकाची पार्श्वभूमी

**छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचे यंदा ३५०वे वर्ष आहे. किल्ले रायगडावर झालेल्या या सोहळ्याचा अपूर्व योग आपल्याला अनुभवता येतो हे भाग्य आहे. येणाऱ्या ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला देशभर डंका दुमदूमणारा सोहळा रायगडावर साजरा होईल. आपण आज जाणून घेऊ, या शिवराज्याभिषेकाची कारणे काय?**

■ **सौरभ कर्डे**

**शिवरायांनी पुरंदरच्या तहाची वेदना गिळून, आग्रा येथील कैद पचवून, पुढील काही काळ स्वराज्याला मजबूत करण्यासाठी श्रम घेतले. या कालावधीत युद्ध, लढाई, आक्रमणे परवडली नसती. झालेल्या नुकसानाची भरपाई तर त्यांनी केलीच; पण काशी विश्वेश्वरावर झालेला हल्ला, उत्तरेतील रयतेवर मुद्दाम लादलेला जिझिया कर यानंतर मात्र त्यांनी म्यानातली भवानी तलवार उपसली आणि पुन्हा एकदा रणतांडव मांडले.**

गेलेला प्रदेश जिंकला. शत्रू सरदार पराभूत केले. गनिमांचे म्होरके स्वराज्याबाहेर हाकलून दिले. गेलेले किल्ले परत मिळवले आणि हे हिंदवी स्वराज्य पुन्हा मोठ्या अभिमानाने राष्ट्रनकाशावर दिसू लागले. पण, या सर्वाला एका गोष्टीची कमी होती ती म्हणजे, राज्याची अधिकृतता.

■ **पार्श्वभूमी** - दिल्ली, चितोड, देवगिरी, विजयनगर अशा पूर्वाश्रमीच्या भारतीय सत्ता बाहेरून आलेल्या परक्या सुलतानांनी नेस्तनाबूत केल्या होत्या. साधारण तीनशेपेक्षा जास्त वर्ष या देशीचा हिंदू राजा सार्वभौम राहिला नव्हता. अशा कालखंडात सोळाव्या शतकात शिवाजीराजांनी स्वबळावर निर्माण केलेले स्वराज्य एकमेव स्वतंत्र होते. पण, त्यास देशभरात लौकिक प्राप्त होणे गरजेचे होते. याखेरीज, शिवरायांना अभिषिक्त होण्यामागे काही तत्कालीन तात्त्विक कारणे होती, ती अशी -

■ शिवाजी महाराज हे जरी मुघलांचे मांडलिक नसले, तरी अजून ते स्वतः सिंहासनाधीश्वर नसल्याने त्यांस मुघलांची सत्ता राजा मानत नसे.

■ मुघल, आदिलशाही, निजामशाही यांच्या लेखी त्यांना जमीनदाराचा एक बंडखोर मुलगा, असे गणले जात असे.

■ युरोपीय व परदेशी सत्ता मुघलांना सत्ताधीश मानत, तर शिवाजी राजांना बंडखोर.

■ स्वराज्याचा भाग सोडल्यास भारतातही लोकांच्या लेखी आदिलशाही व मुघलशाहीला टक्कर देणारा, वरचढ ठरलेला सेनानी म्हणजे शिवाजी असे त्याकाळी मानत.

■ राजांनी दिलेली वतने, इनामे, केलेले करार, तह यांना कायदेशीर अधिकृतता (तत्कालीन लोकमान्यता ) मिळण्यासाठी, राजांचा अभिषेक होणे ही देशाची, स्वराज्याची गरज होती.

■ राज्याभिषेक झाल्याने सर्वसामान्य लाखो जनतेच्या मनामध्ये अभिषिक्त सिंहासनाधीश्वर छत्रपती म्हणून राजांची प्रतिमा किंवा ओळख निर्माण होणार होती.

■ या अशा काही तत्कालीन सामाजिक त्रुटींची, समाज भावनांची, स्वराज्याची, भारतीय राष्ट्रीयत्वाची आत्यंतिक आवश्यक गरज म्हणून शिवरायांनी राज्याभिषेकाचा निर्णय घेतला. जागा ठरली - राजधानी किल्ले रायगड. दिवस ठरला - ज्येष्ठ शुध्द त्रयोदशी, शालिवाहन शके १५९६ शनिवार (जून १६७४)

*(लेखक शिवव्याख्याते आहेत.)*




visit sakalnie.in

'सकाळ' सादर करीत आहे

## मुलांचं हक्काचं वृत्तपत्र!

- ज्ञान, माहिती, मनोरंजन आणि उपक्रम -



सकाळ NiE NEWSPAPER IN EDUCATION

वार्षिक वर्गणी फक्त ₹ ३००/-

शैक्षणिक वर्षातील प्रत्येक शुक्रवारी वृत्तपत्र

१२ पानी रंगीत अंक

- NIE उपक्रमात मिळणाऱ्या सेवा-सुविधा -

**शालेय शिक्षणासाठी अँड्रॉइड ॲप मोफत**
इयत्ता ५ वी ते १० वी च्या मराठी आणि सेमी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांना रिव्हीजनसाठी NiE मोबाईल ॲप

**अनेक वर्कशॉप्स आणि धमाल स्पर्धा!**
पर्यावरणपूरक गणपती मेकिंग, किल्ला बनवा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, इव्हेंट्स आणि ऑनलाईन स्वरूपात विनामूल्य तसेच सशुल्क विविध स्पर्धा.

**आकर्षक गिफ्ट मिळवा!**
QR Code स्कॅन करून वार्षिक वर्गणी भरा व ₹६९९/- चे आकर्षक गिफ्ट मिळवा!
FREE

NIE अंक पाहण्यासाठी वरील QR कोड स्कॅन करा

- NiE अंकामध्ये प्रसिद्ध होणारी माहितीपर आणि मनोरंजक सदरे -

**जनरल नॉलेज :** इतिहास, भूगोल, विज्ञानातल्या फॅक्ट्स, नवीन टेक्नॉलॉजीची माहिती । **नव्या गोष्टी शिकूया :** वेळेचं महत्त्व, छंद जोपासणं आणि सकारात्मक विचार । **आरोग्य :** डाएट, योग्य दिनक्रम, व्यायाम याची गोडी लावणारी माहिती । **संस्कार :** श्लोक, सुविचार, ग्राफिटी आणि धमाल विनोद । **हे करून पाहा :** कोडी, सुडोकू, चित्रकला । **माझं पान :** शाळा, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी लिहिलेले साहित्य । **आनंददायी शनिवार**

आपल्या वृत्तपत्र विक्रेत्याकडे आजच नावनोंदणी करा. | अधिक माहितीसाठी संपर्क 98815 98815

सकाळ NiE **सभासद नोंदणी फॉर्म**

आजच फॉर्म भरा आणी NiE वृत्तपत्र सुरू करा

फॉर्म नं: ______

विद्यार्थ्याचे नाव : ______
घराचा पत्ता : ______
तालुका : ______ जिल्हा : ______ पिनकोड : ______
ई मेल : ______ पालकांचा मोबाईल नंबर ______
शाळेचे नाव : ______
इयत्ता : ______ तुकडी : (   ) NIE सभासद रक्कम : ______
सभासद कालावधी : ______ ते ______
अंक चालू करण्याची तारीख : ______ रोख ☐ ऑनलाईन ☐

विद्यार्थी / विद्यार्थिनी / वाचकाची सही — शुल्क स्वीकारणाऱ्याचे नाव व सही

**वृत्तपत्र विक्रेता / एजंट तपशील**

खाते क्रमांक : ______ एजंटचे पूर्ण नाव : ______ गाव : ______
विक्री केंद्राचे नाव : ______ विक्रेत्याचे नाव : ______ खाते क्रमांक : ______

**सभासद शुल्क पोचपावती**

दिनांक : ______ २०२४

कुमार / कुमारी ______ यांचेकडून

सकाळ NIE या उपक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ चे वार्षिक सभासद शुल्क रक्कम ₹ ३००/- रोख मिळाली.
धन्यवाद !

शुल्क भरणाऱ्याची सही — शुल्क स्वीकारणाऱ्याचे नाव व सही

संपर्कासाठी नं. : ९८८१५ ९८८१५ सकाळ NiE NEWSPAPER IN EDUCATION



दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.

# विक्रमांची अजब दुनिया



## व्हिडिओ गेम्सचा चाहता

**मारिओ, कॉन्ट्रास्टाईक, जीटीए, एफ - १ रेसिंग या सारख्या गेम्स खेळणाऱ्यांची संख्या एकेकाळी फार मोठी होती बरं का. यापैकी काही गेम्स तुम्हाला आजही माहीत असतील.** आजही अनेकांनी पूर्वीच्या व्हिडिओ गेम्सच्या चिप, कॅसेट्स स्वतःकडे जपून ठेवलेल्या आहेत. अमेरिकेतील टेक्सासमध्ये राहणाऱ्या अशाच एका गेमरनं व्हिडिओ गेम्सचा भलामोठा संग्रह करून ठेवला आहे. ॲन्टिनोओ मॉन्टिरो असं या ४५ वर्षीय अवलियाचं नाव आहे. वयाच्या दहाव्या वर्षापासून ॲन्टिनोओ यांनी गेम्सच्या कॅसेट जमा करण्यास सुरुवात केली होती. आतापर्यंत त्यांनी तब्बल २४,२६८ गेम्सचा संग्रह केला आहे. हा गेम्सचा संग्रह किती रुपयांचा असेल ठाऊक आहे? तर २१ लाख रुपयांचा. अबब..!




## अबब! इतकी रबरी बदकं?

**अमेरिकेतील एका महिलेनं एक जागतिक विक्रम केलाय. चेअरलोट ली या महिलेकडे तब्बल ५ हजार ६३१ बदकं आहेत. आता तुम्ही म्हणाल, इतकी सारी बदकं? तर ही बदकं रबराची आहेत हं.** या महिलेनं १९९६ पासून रबराची बदकं गोळा करण्यास सुरुवात केली होती. यातील बदकं वेगवेगळ्या आकाराची, वेगवेगळ्या देशांतून आणलेली आहेत. काही बदकं तर वेगवेगळ्या रंगांची आणि कॅरेक्टर असणारी आहेत. भारी ना. ही रबराची बदकं ठेवण्यासाठी या मॅडमनं वेगळी खोलीच तयार केली आहे म्हणे. रबरी बदकांचा हा संग्रह खराब होऊ नये म्हणून चेअरलोट ली यांना फार काळजी घ्यावी लागते बरं का.

## पत्त्यांचा बंगला


**'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला' हे गाणं तुम्ही ऐकलंच असेल; पण, आता 'असावा सुंदर पत्त्यांचा बंगला' असं गाणं तयार होऊ शकतं बरं का.** कारण, कोलकात्यातील एका 'दादा'ने पत्त्यांपासून एक-दोन नाही, तर तब्बल चार प्रेक्षणीय स्थळांच्या प्रतिकृती साकारल्या आहेत. आहे ना आश्चर्यकारक? अर्णव डागा असं या १५ वर्षांच्या दादाचं नाव आहे. पत्त्यांद्वारे या प्रतिकृती साकारण्यासाठी त्याला थोड्याथोडक्या नाही, तर तब्बल १ लाख ४३ हजार पत्त्यांचा वापर करावा लागला. तुम्हीही तयार करून पाहा असाच एखादा पत्त्यांचा बंगला.



## अनोखं घड्याळ




जगात काही वस्तू- जीव हे खरोखरच दुर्मीळच असतात. अमुक-अमुक भागात दुर्मीळ हिरा, दुर्मीळ प्राणी-पक्षी, दुर्मीळ वनस्पती आढळल्याचं तुम्ही अनेकदा ऐकलं किंवा पाहिलं असेल. परंतु दुर्मीळ, अनोखं असं घड्याळ तुम्ही कधी पाहिलं आहे का? स्वित्झर्लंडमधील लेस ॲटलिअर्स लुईस मॉउनेट एस.ए यांनी त्यांच्याकडे एक अनोखं घड्याळ असल्याचं सांगितलं आहे. या घड्याळात म्हणे अंतराळातून पृथ्वीवर पडलेल्या दगडांचा वापर केलेला आहे. वाचायला थोडं गजब वाटत असेल ना; पण मित्रांनो हे खरं आहे. या घड्याळात आकड्यांऐवजी १२ दुर्मीळ दगडांचा वापर करण्यात आला आहे म्हणे.



स्क्रीन टाइम

'ज्युरासिक वर्ल्ड- कॅम्प क्रेटेशस'



### कशासाठी बघायची वेबसीरीज ?

- संकटाला कसे धैर्याने सामोरे जावे याची शिकवण मिळते.
- मैत्री कशी जपावी याचा धडा मिळतो.
- जगण्याचा संघर्ष पाहायला मिळतो.

# डायनासोरच्या जंगलातील थरारक वेबसीरिज

**मित्र-मैत्रिणींनो, ज्युरासिक पार्क हा चित्रपट तुम्ही पाहिला असेलच. अवाढव्य डायनासोर आणि त्या डायनासोरच्या हल्ल्यात अडकलेली माणसांची जीवघेणी कसरत पाहताना अक्षरशः अंगावर काटा येतो. पण, दोन-तीन तासांत हे चित्रपट संपतात आणि आपला मूड जातो. पण, आता तसं होणार नाही. कारण 'ज्युरासिक वर्ल्ड- कॅम्प क्रेटेशस' ही वेबसीरिज तुमचं पोटभर मनोरंजन करते.**

**वेबसीरिजची गोष्ट :** ही गोष्ट आहे डायनासोरच्या बेटावर अडकलेल्या सहा मुलांची. त्याचं होतं असं की ही सहा मुले एकमेकांना ओळखत नसतात. एका संस्थेने आयोजित केलेल्या गेममध्ये अनेक मुलं भाग घेतात. त्यातील विजयी मुलांना एका बेटावर कॅम्पसाठी नेण्यात येते. त्या बेटावर शेकडो डायनासोरचे जतन केलेले असते. आपण जसे प्राणिसंग्रहालय पाहायला जातो त्याचप्रमाणे ही सर्व मुले त्या बेटावर जातात. मात्र, तिथे अचानक एक अपघात घडतो आणि सर्व डायनासोर जाळीतून बाहेर पडतात. मोठा गोंधळ उडतो. सर्व जण बोटीत बसून पुन्हा आपल्या शहराकडे निघतात मात्र सहा जण त्याच बेटावर अडकतात. आता त्यांचे पुढे काय होते? डायनासोरपासून ते वाचतात का? कशाप्रकारे लढा देतात? कसे जगतात? अशा साऱ्या प्रश्नांची उत्तरे म्हणजे 'ज्युरासिक वर्ल्ड- कॅम्प क्रेटेशस' ही वेबसीरिज होय.

**वेबसीरिजचे वैशिष्ट्य :** सहा सीझन आणि प्रत्येक सीझनमध्ये सहा-सात एपिसोड असल्याने ही वेबसीरिज मुलांचे भरपूर मनोरंजन करते. चित्रपट ॲनिमेटेड असला तरी खरेपणाचा भास व्हावा एवढ्या ताकदीचे ॲनिमेशन बनविण्यात आले आहे. शिवाय उत्कृष्ट गोष्ट असल्याने कुठेही भ्रमनिरस होत नाही.

**कुठे उपलब्ध ? :** Netflix

माय रेसिपी

पिझ्झा खायला सर्वांनाच आवडतो. पण, 'बाहेरचं खाऊ नका' असं आईबाबा सारखं बोलतात ना? हरकत नाही. आज आपण घरातल्या घरात आणि आईबाबांच्या आवडत्या भाजीपाल्यांनीच इंडियन पिझ्झा बनविणार आहोत. कसा? चला आजची रेसिपी पाहूयात.

### प्रयोग करा

आपण जी रेसिपी करणार आहोत ती एगलेस आहे. पण, तुम्हाला अंड्याचा पिझ्झा खायचा असेल तर भाज्यांमध्ये दोन-तीन अंडी फेटून टाकल्यास अधिक प्रोटिनयुक्त असा हा अंडा पिझ्झा तयार होऊ शकतो.

## चला बनवू इंडियन पिझ्झा

**साहित्य :** एक वाटी गव्हाचे पीठ, अर्धी वाटी मैदा, पाव वाटी बेसन, पीठ किंवा बारीक केलेले डाळे, टॉपिंगसाठी बारीक चिरलेली ढोबळी मिरची, गाजर, कोबी, बीट, घेवडा इत्यादी, अर्धी वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, चीज व पनीर गरजेनुसार, एक चमचा आले - लसूण - मिरची पेस्ट, मीठ, एक चमचा लिंबाचा रस, टोमॅटो सॉस, जिरे, बारीक चिरलेला एक कांदा व टोमॅटो.

**कृती :** भाज्या वेगळ्या उकडून घ्या व बाजूला ठेवा. तेलात जिरे घालून, कांदा टोमॅटो परतून घ्या. आले- लसूण- मिरचीची पेस्ट घालून उरलेल्या सगळ्या भाज्या टाकून गॅस मोठा करून भरपूर परता. शेवटी कुस्करलेले पनीर, कोथिंबीर व लिंबाचा रस किंवा आमचूर पावडर टाका. मिरेपूड घालू शकता. कणीक, मैदा, बेसन, मीठ व बाजूला ठेवलेल्या उकडलेल्या भाज्या घालून सैल कणीक भिजवा. त्याची जाडसर पोळी लाटून प्रथम तव्यावर शेकून घ्या. नंतर तो बेस खाली घेऊन त्याला टोमॅटो सॉस लावा. त्यावर टॉपिंगच्या भाज्या घालून त्यावर चीज किसून घाला. पॅन गरम करून त्यात थोडेसे लोणी टाका व हा पिझ्झा दोन्ही हातांनी उचलून पॅनमध्ये मंद आचेवर ठेवा. वरून झाकण ठेवा. चीज वितळले की पिझ्झा डिशमध्ये घेऊन त्रिकोणी कापून सर्व्ह करा.

**कोणास फायद्याचे ? :** पोषणमूल्यांनी भरलेला हा पिझ्झा तरुण मुला-मुलींसाठी फायद्याचा ठरतो. हाय प्रोटिन, हाय कॅल्शिअम व फायबर असल्याने आरोग्याच्या दृष्टीने हा पिझ्झा उपयोगी ठरतो. सुट्टीच्या दिवशी जंकफूड्सचा नाष्टा करण्यापेक्षा असा वेगळा प्रयोग नक्की करून पाहा. खेळाडूंना भरपूर खेळून झाल्यानंतर भूक लागते त्यावेळी हा खाऊ पोटभरू ठरतो.



? ४) व्हिडिओ गेमच्या विक्रमी संग्रहात किती कॅसेट आहेत?

✓ ८) पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरुवात १८७७ मध्ये झाली.

# धाडसी आणि शूर मुलान

**मुलान हे एका चीनी मुलीचे पात्र. त्यावर डिस्ने पिक्चर्सने १९९८ मध्ये ॲनिमेटेड चित्रपट काढला. हुआ मुलान या चिनी दंतकथेवर हा व्यंग्यपट आधारित आहे. बॅरी कुक आणि टोनी बॅनक्रॉफ्ट यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले.**

## चित्रपटाची गोष्ट

चित्रपटाचे कथानक चीनमधील एका शाही राजघराण्याभोवती फिरते. फा मुलान ही ज्येष्ठ योद्धा असलेल्या फा झोऊ यांची कन्या. नायिका हुआ मुलान ही पेहराव बदलून सैन्यात भरती होते. विशेष म्हणजे सैन्यात मुलींना स्थान नसते आणि पितळ उघडे झाल्यास कडक शिक्षा होईल, हे ठाऊक असतानाही ती सैन्यात जाते. अपंग आणि थकलेल्या वडिलांना युद्धावर जाण्याची वेळ येऊ नये, यासाठी ती ही जोखीम पत्करते. राजाने सर्वांनाच सैन्यात भरती होण्याचे बंधन घातलेले असते. मुलान धाडस दाखवत सैन्यदलात घुसते मात्र अखेर तिचे रहस्य उलगडते. अशा परिस्थितीतही ती हुन आक्रमकांना चारीमुंड्या चीत करत महाराजांचा प्राण वाचविते. परिणामी तिचा गौरव होतो. सैन्यदलात तिला सामावून घेतले जाते.



## डिस्नेची आठवी राजकुमारी

२००४ मध्ये 'मुलान' सिक्वेल 'मुलान भाग -२' आला. त्याचे निकी दारो यांनी दिग्दर्शन केले होते. यातील फा मुलान या पात्राचा आवाज चिनी अभिनेत्री मिंग ना वेनने दिला तर गायिका ली सालोंगा यांनी पात्राच्या गाण्याचा आवाज दिला. लेखक रॉबर्ट डी सॅन सॉसी यांनी साकारलेले मुलान हे पात्र बल्लाड ऑफ मुलान या कवितेतील प्रख्यात चिनी योद्धा हुआ मुलानवर आधारित आहे. डिस्नेने आजवर साकारलेल्या एकूण राजकुमाऱ्यांपैकी मुलान ही आठवी राजकुमारी ठरली.

## 'मुलान' चित्रपटाचा वाद

मोठ्या पडद्यावर आणि डिजिटल स्क्रीनवर मुलानने कुटुंबाचा गौरव वाढवला होता. मात्र रुपेरी पडद्यावर चित्रपट आणण्याचा प्रयत्न झाला तेव्हा जगात अनेक ठिकाणी तिला वादाचा सामना करावा लागला. अमेरिका, हाँगकाँग, तैवान एवढेच नाही तर चीनमध्ये देखील मुलानवर वादग्रस्ततेचा शिक्का लावला गेला. मुलानचे शूटिंग न्यूझीलंड आणि चीनच्या शिजियांग प्रांतात झाले. मात्र एका वादग्रस्त मुद्द्यांमुळे सोशल मीडियावर डिस्ने स्टुडिओवर टीका सुरू झाली. मुलान चित्रपटावर बहिष्काराचे आवाहन केले.अनेक मार्गाने अडचणी आणण्याचा प्रयत्न केला. चीनवर आधारित आणि चीनच्या प्रेक्षकांना आकर्षित करण्यासाठी डिस्नेने साकारलेला चित्रपट वादात अडकत गेला. कोरोनानंतर प्रदर्शित होणाऱ्या बड्या चित्रपटात मुलानचे नाव घेतले जात होते. १९९८ मध्ये ॲनिमेटेड चित्रपट पाहून अनेकांना त्याबाबत उत्सुकता लागली होती. डिस्नेला देखील आशा होत्या. मात्र हा प्रयत्न फारसा यशस्वी ठरला नाही.





## ३० कोटी ४० लाख डॉलरची कमाई

- या चित्रपटाची निर्मिती १९९४ मध्ये सुरू झाली. पडद्यावर चीनचे वातावरण आणण्यासाठी अमेरिकेच्या अनेक कलाकारांना, परीक्षकांना चीनमध्ये पाठविण्यात आले. मुलानचा प्रीमियर शो लॉस एंजलिस येथे हॉलिवूड बाउल येथे ५ जून १९९८ मध्ये झाला आणि तो १९ जून रोजी संपूर्ण अमेरिकेत प्रदर्शित झाला. या चित्रपटाला समीक्षक आणि लोकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.
- प्रेक्षकांनी ॲनिमेशन, कथानक आणि पात्रांचे विशेष कौतुक केले. पार्श्वसंगीतानेही वाहवा मिळवली. ९ कोटी डॉलरच्या बजेटमध्ये तयार झालेल्या या चित्रपटाने ३० कोटी चाळीस लाख डॉलरपेक्षा जास्त कमाई केली. शिवाय गोल्डन ग्लोब आणि अकादमी पुरस्कारातही चित्रपटाला नामांकन मिळाले. सर्वोत्तम ॲनिमेटेड गुणांसह अनेक ॲनी पुरस्कारही 'मुलान'ने मिळवले.

## टेलिफोन कसे काम करतो?



**मित्र-मैत्रिणींनो, टेलिफोनद्वारे एखादी व्यक्ती जगाच्या दुसऱ्या बाजूच्या व्यक्तीशी सहजपणे बोलू शकते.** मात्र, हे साधन कसं काम करतं हे तुम्हांला माहीत आहे का? पारंपरिक दूरध्वनी तारांद्वारे एकमेकांशी जोडलेले असतात. ते आवाज पाठवण्यासाठी तारांवर अवलंबून असतात. यात एक हँडसेट आणि एक बेस असतो, ते एकमेकांना कॉर्डने जोडलेले असतात. हँडसेट कॉल करण्यासाठी किंवा त्याला उत्तर देण्यासाठी वापरला जातो. हँडसेटच्या एका टोकाला बोलण्यासाठी मायक्रोफोन आहे. दुसऱ्या टोकाला ऐकण्यासाठी एक लहान लाऊडस्पीकर आहे. बेस टेलिफोनला वायरद्वारे विद्युत प्रवाहाशी जोडतो. जेव्हा आपण टेलिफोनमध्ये बोलतो, तेव्हा मायक्रोफोन हा आवाज इलेक्ट्रिक सिग्नलमध्ये बदलतो. बेस त्याच्या वायरद्वारे सिग्नल पाठवतो. तेथून सिग्नलचा प्रवास कसा होतो? ते कॉल कोठे जातो यावर अवलंबून असते. ते तारा आणि केबल्समधून विद्युत प्रवाहाच्या स्वरूपात वाहू शकते, तसेच ते हे पातळ काचेच्या तंतूंमधून प्रकाशाच्या स्वरूपात प्रवास करू शकते. माहिती पाठवण्याच्या या पद्धतीला फायबर ऑप्टिक्स म्हणतात. सिग्नल रेडिओ लहरींमध्येही बदलले जाऊ शकतात आणि अँटेना आणि उपग्रहांद्वारे हवेतून पाठवले जाऊ शकतात. जेव्हा सिग्नल दुसऱ्या टोकाला टेलिफोनवर पोहोचतो, तेव्हा त्या टेलिफोनचा लाऊडस्पीकर त्याला परत कॉलरच्या आवाजात बदलतो.

असं का?...

डॉ. दीप्ती सिधये

## कॉर्डलेस फोन आणि मोबाइल कसे काम करतात?



**दोस्तांनो, कॉर्डलेस टेलिफोन इलेक्ट्रिक सिग्नल आणि रेडिओ लहरी दोन्ही वापरतो. पारंपरिक टेलिफोनप्रमाणे केलेला कॉल बेसला इलेक्ट्रिक सिग्नल म्हणून प्राप्त होतो.** मग बेस इलेक्ट्रिक सिग्नलला रेडिओ लहरींमध्ये बदलतो. अँटेना वापरून, बेस हवेतून लहरी हँडसेटवर पाठवतो. हँडसेटचा अँटेना या लहरींना पुन्हा आवाजात बदलतो.

सेल्युलर टेलिफोन किंवा सेल फोन हे कॉर्डलेस फोनपेक्षा अधिक सोयीस्कर असतात, कारण ते खूप विस्तृत क्षेत्रावर कार्य करतात. यामुळे आपण त्यांना मोबाइलही म्हणतो. ते रेडिओ लहरी वापरून कॉल पाठवतात आणि घेतात. सेल फोन कंपन्या शहरासारख्या क्षेत्राचे सेल नावाच्या विभागांमध्ये विभागणी करतात. प्रत्येक सेलमध्ये रेडिओ लहरी प्राप्त करण्यासाठी आणि पाठवण्यासाठी एक टॉवर असतो. कॉलर एका सेलमधून दुसऱ्या सेलमध्ये प्रवास करत असल्यास, कॉल एका टॉवरमधून दुसऱ्या टॉवरवर स्विच होतो. याचा अर्थ असा की, सेल फोन कंपनीचे नेटवर्क पोहोचेल त्या ठिकाणी सेल फोन काम करू शकतो. सेल-फोन नेटवर्क संपूर्ण देशात असू शकते. सेल फोन जेव्हा चालू केला जातो, तेव्हा तो एक विशेष सिग्नल पाठवतो. त्या फोनवर येणारे कॉल कोठे पाठवायचे? हे त्या सिग्नलमुळे 'नेटवर्क'ला कळते.

? ५) मुलानवर पहिला चित्रपट कधी काढला गेला?

✓ ३) स्टिक अप फॉर मायसेल्फ या पुस्तकातून ठामपणाचे महत्त्व कळते.

# CONVERSATIONS OR SITUATIONS AT A BANK

## Opening a Bank Account

**POLITE INQUIRY :** "Good morning. I would like to open a bank account, please."

**FORMAL REQUEST :** "Hello. I am interested in opening a new account. Could you assist me with the process?"

**GENERAL QUERY :** "Hi, can you help me set up a bank account?"

**SEEKING INFORMATION :** "Excuse me, I'm considering opening an account here. What are the requirements?"

## Depositing Money

**STRAIGHTFORWARD REQUEST :** "I'd like to deposit some money into my account."

**SPECIFIC AMOUNT :** "I need to deposit Rs5000 into my savings account."

**CONFIRMATION :** "Can you please confirm the deposit into my account?"

## Withdrawing Money

**BASIC WITHDRAWAL :** "I'd like to withdraw some cash from my account."

**AMOUNT SPECIFICATION:** "Could I withdraw Rs2200 from my checking account?"

**ATM INQUIRY :** "Could you show me how to use the ATM to withdraw money?"



# LETTER WRITING

WHAT IS A **FORMAL LETTER ?**

A formal letter is a polite way of writing a message for official or professional reasons, using a specific format and respectful language.

A formal letter is typically addressed to a specific person or organization, such as a teacher, employer, government official, or business entity.

It typically includes an introduction, body, and conclusion, with clear and concise language.

Formal Letter to a Teacher / Principal : Leave application

**Introduction**


Example : Greetings esteemed Principal/ Teacher; I trust this correspondence finds you well. My name is Aditi/Aditya Sharma, and I am a diligent student in Class 8. I am writing to request you to grant me a leave from school due to my sister''s imminent wedding.

**Body**

Example : "As stated, the reason for my absence is my sister''s wedding, which is scheduled to take place from [Start Date] to [End Date] in (place). As an integral part of the preparations and the ceremonies, my presence is required at home."

**Conclusion**

Example : "I promise to cover all the missed lessons and assignments during my absence. I will stay in touch with my classmates to ensure I am up to date with the syllabus."



# IMPROVE VOCABULARY

दोस्तांनो, आपण सगळे रोज अनेक इंग्रजी शब्द ऐकतो, पण त्यांचा वाक्यात उपयोग करायला सांगितला तर आपल्याला पटकन जमेलच असं नाही. यासाठी सराव करणं आवश्यक आहे. त्यामुळे आपण काही इंग्रजी शब्द घेऊन त्यांचा वाक्यात उपयोग कसा करायचा? हे जाणून घेऊया. चला तर मग, नेहमी वाचनात येणारे, कानावर पडणारे आणि बोलले जाणारे काही शब्द पाहूया. असेच आणखी काही शब्द निवडून तुम्ही तुमचा सराव करा.

- शीतल करंदीकर

1 **पाणीटंचाई :** scarcity of water - During summers we all face a problem of scarcity of water.

(summer = उन्हाळा; face a problem = समस्येला सामोरं जाणं; समस्येला तोंड देणं)

2 **पाणी बचत :** water conservation - Water conservation today, will save the world tomorrow.

3 **जल प्रदूषण :** water pollution - Water pollution leads to health problems.

4 **भीषण :** dreadful - There was a dreadful accident on the highway yesterday.


5 **पत्रा :** tin - The house had a tin roof.

6 **डांबर :** tar - Roads in cities are usually made of tar.

7 **धीर, संयम :** patience - I told him to have patience.

8 **धीर, धैर्य :** courage - He did not have the courage to go ahead.







9 **संसर्ग :** infection - The infection spread rapidly.

10 **मर्यादा :** limit - There is a limit to people's patience.

11 **सीमा :** boundary - Let us salute our soldiers who guard the boundary of our country.

12 **स्थिती :** condition - His health was not in a very good condition.

13 **चाचणी :** trial - They took a trial of the machine before selling it.

14 **दिलासा :** relief - The news of her safety was a big relief for everyone.

15 **लक्षणं :** symptoms - The woman showed symptoms of malaria.

STORY

# The Great Toilet Paper Caper

In the bustling suburb of Sunnyvale, where the lawns were greener than envy and the gossip juicier than ripe watermelons, lived the mischievous trio: Raj, Maya, and Aryan. With mischief in their hearts and laughter on their lips, they were always on the lookout for their next great adventure.

One ordinary afternoon, as boredom threatened to swallow them whole, inspiration struck like lightning. With a twinkle in their eyes and a plan so outrageous it bordered on insanity, they set out to execute the greatest prank the neighbourhood had ever seen—the Great Toilet Paper Caper.

Armed with rolls of toilet paper pilfered from their own homes, they stealthily crept through the streets under the cover of dusk, like ninjas on a clandestine mission. Their target? The unsuspecting homes of their neighbours, ripe for a bit of mischief and mayhem.

With precision and panache, they set to work, draping trees, shrubs, and even the occasional mailbox in swathes of white like winter had come early. Their laughter echoed through the night as they danced through the streets, leaving a trail of toilet paper in their wake like the world''s oddest breadcrumb trail.

But just as they were revelling in their triumph, disaster struck. A loud crash echoed through the neighbourhood, followed by a chorus of angry shouts. With hearts pounding and adrenaline coursing through their veins, Raj, Maya, and Aryan scrambled to hide, like deer caught in the headlights of their own folly.

As the commotion died down and the dust settled, they emerged from their hiding spots, faces flushed with embarrassment and laughter bubbling up like a poorly contained volcano. For you see, the Great Toilet Paper Caper had been a resounding success—a prank so audacious, it would be talked about for years to come.

And as they made their way home under the cover of dawn, their pockets empty and their hearts full of mischief, Raj, Maya, and Aryan knew that their bond was stronger than ever, forged in the fires of laughter and the chaos of their own making.

KIDS crossword

"Solar system"

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| V | H | R | M | P | K | X | N | U | M |
| E | A | B | E | L | J | E | E | W | O |
| N | F | B | R | U | U | A | P | V | O |
| U | J | B | C | T | P | R | T | G | N |
| S | J | K | U | O | I | T | U | K | M |
| D | R | V | R | K | T | H | N | B | A |
| W | L | L | Y | E | E | B | E | F | R |
| K | S | U | N | V | R | Z | A | S | S |
| N | B | V | Q | S | A | T | U | R | N |
| A | Y | A | M | U | R | A | N | U | S |



## Father and Son



Once, a farmer and his son were passing through a jungle. On the way, they came across a cat that was lying exhausted.

"See father, a beautiful cat! Let us take it with us. I will have a friend to play with," the son said.

" No, son.It is a wild cat. Taming it won't be easy.It may even hurt you," the father replied.

But,the son was not convinced. He began to cry. " I wouldn't come without the cat," he said.

# UNIVERSAL LANGUAGE

Shailesh Barge



English... some call it a universal language, and some adore it by calling it Lingua Franca. In countries like India, where once it was language of rulers seem to be utilized, respected and preferred as an Official language. And of course, it is because of its charismatic and widely use. It has become our jurisdictional, official, bureaucratic, legal, scientific, corporate and the language of status. Such an unbelievable benchmark this language has earned that people, irrespective of age, class, gender or field, seem to be haunted learning and using it in their day-to-day life, as far as possible. Before we get started, we should understand the potential and the importance of this language. English is an official language of 67 countries, including the super-powerful country like Untied States of America and one of the biggest democracies like India, as well. As per the statistics, The United States and India have the most total English speakers, with 306 million and 265 million, respectively. Astonishingly, only 0.1 percent of total population of India use English as their first language. That means, still there is a huge number waiting to learn this language and to use it as their first and preferred language. It is, now, well understood that to be a successful and sought after person in whatever field one is working, one needs to tackle this challenge of making oneself English-friendly.

That rings the bell. It helped me to reach out to my objective of starting a series of articles here where those who need to learn English and necessary grammar will be benefited.

In short, you will be guided and helped to understand some of the important topics of grammar of English in the form of various activities. Trust me, I believe into Learning with fun. I assure you this journey will be learner-friendly and will help you to achieve your destination of learning this beautiful language.

GRAMMAR BITE

# The Tale of MAKE & DO

Once upon a time in Grammar land, two heroes ruled the kingdom: Make and Do.

Make was the crafty creator, always busy making new things. He loved to :-

- Make delicious cakes
- Make beautiful drawings
- Make friends smile

Do was the action hero, always on the move, completing tasks. He loved to :-

- Do homework
- Do chores
- Do exercises

One day, a student asked, "How do I know when to use you?" Make replied, "Use me when you"re creating something new!" Do added, "And use me when you"re finishing a task or action!" And so, the student learned the magic of "make" and "do," and Grammarland was happy ever after!

# संस्कार

## सुभाषित

विधिमवलम्ब्य योऽन्नपानंबलमिव विग्रहवत्सदोपयुङ्क्ते ।
तनुमपि तनुजां रुजं त्वनाप्यव्रजति नरः स समाशतस्य पारम् ।।

जो मनुष्य आपल्या शरीरबलानुसार योग्य अन्नाचे सेवन करतो, त्याला शरीरजन्य रोग होत नाहीत व तो शंभर वर्षांहून अधिक जगतो. केवळ आपल्या जिभेचे चोचले पुरविण्यासाठी नाही, तर ऋतू, काल व शरीरबल यांचे भान ठेवून आहार केला, तरच मनुष्य शरीराच्या व्याधींपासून लांब राहू शकतो.

## सुविचार

शहाणा माणूस बोलण्यापूर्वी विचार करतो;
तर मूर्ख माणूस बोलल्यानंतर विचार करतो.

## गीता श्लोक

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।

ज्याच्यापासून सर्वभूतांची प्रवृत्ती झाली आहे, ज्याने हे जग निर्माण केले आहे, विस्तारले किंवा व्यापले आहे त्याची पूजा स्वभावानुसार प्राप्त झालेल्या कर्मांनी केली, म्हणजे मनुष्याला सिद्धी प्राप्त होत असते.

## दिनविशेष



**१४ जून**

**१९३८ :** सुपरमॅनची चित्रपट कथा पहिल्यांदा प्रकाशित. अनेक वर्षांपासून सुपरमॅनने मुलांच्या मनावर आधिराज्य गाजवले आहे.



**१७ जून**

**१९९१ :** माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान जाहीर.



**२० जून**

**१८७७ :** अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांनी कॅनडा मध्ये जगातील पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरूवात केली.

## बोधकथा

प्रशांत सरुडकर



# मूर्खांना उपदेश

**एका घनदाट जंगलात वानरांचा कळप राहत होता. पावसाळा सुरू झाला की, त्या जंगलात मुसळधार पाऊस पडे. सर्व वानरे पावसामुळे भिजत असत. रात्रभर थंडीने गारठून जात. तेव्हा त्यांच्या मनात विचार येई, माणसासारखे आपणाला जर घर असते तर? आणि ते ठरवत की पावसाळा संपला की आपण घर बांधायचे आणि पुन्हा विसरून जात. पावसाळ्यानंतर हिवाळा आला.** त्या जंगलात बर्फवृष्टी सुरू झाली. अंगाला झोंबणारा गार वारा वाहू लागला. झाडावरील वानरे या नैसर्गिक संकटापुढे हतबल झाली. थंडीने त्यांना खूप त्रास होऊ लागला. आधारासाठी त्यांनी सर्वत्र भटकंती केली, पण सुरक्षित निवारा त्यांना सापडेना. थंडीमध्ये माणसे शेकोटी करतात, हे वानरांनी पाहिले होते. त्यातील एक वानर म्हणाले, 'या थंडीपासून बचाव करण्यासाठी आपण शेकोटी करू.' माणसांनी केलेल्या शेकोटीचा रंग लाल असतो, हे वानरांच्या लक्षात होते. तेवढ्यात त्यांना जमिनीवर लालभडक गुंजा दिसल्या. वानरांना वाटले हे अग्नीचे निखारेच आहेत. त्यांनी सर्व गुंजा एकत्र गोळा केल्या. वाळलेले गवत त्याच्यावर टाकले व त्यांना फुंकर मारू लागले. थंडीपासून बचाव करण्यासाठी वानरांचे सुरू असलेले प्रयत्न जवळच्याच एका झाडावर बसलेल्या सूचिमुख नावाच्या पक्ष्याने पाहिले. वानरांच्या मूर्खपणाचे त्याला हसू आले. तो त्यांच्याजवळ जाऊन म्हणाला, 'मित्रांनो, तुम्ही एवढा वेडेपणा कराल असे मला वाटले नव्हते. तुम्हाला शेकोटी करायची आहे, यासाठी अग्नीची गरज आहे. तुम्ही या लाल गुंजा एकत्र करून त्याच्यावर फुंकर मारत बसलेला आहात. तुम्हाला अग्नी कधीही मिळणार नाही. ही शेकोटी पेटणार नाही. या असल्या प्रकारच्या शेकोटीमुळे तुमची थंडी कधीच जाणार नाही. त्यापेक्षा तुम्ही पलीकडच्या डोंगरामध्ये असणाऱ्या गुहेमध्ये जाऊन आश्रय घ्या. बर्फापासून आणि थंडीपासून तुमचे संरक्षण होईल.'

सूचिमुख पक्ष्याचे हे शब्द ऐकताच त्यातील एक वयोवृद्ध वानर म्हणाला, 'आम्ही काय करतोय याचे तुला काय करायचे आहे? तू तुझा निमूट झाडावर जाऊन बस. आमच्यामध्ये भाग घेऊ नकोस. शहाणपणा शिकवू नकोस. आम्हाला विश्वास आहे, आमची शेकोटी थोड्याच वेळात आम्हाला ऊब देईल.'

वानराचे हे शब्द ऐकताच सूचिमुख म्हणाला, 'तुम्ही कितीही प्रयत्न केला तरी ही शेकोटी पेटणार नाही व तुम्हाला ऊब मिळणार नाही. तुम्ही हा वेडेपणा सोडून द्या. विनाकारण शक्ती वाया घालवू नका. इथेच बसून राहिला तर थंडीमुळे मराल.'

सूचिमुख पक्ष्याच्या उपदेशाचा सर्व वानरांना अतिशय राग आला. त्यातील काही वानर झाडावर चढले आणि सूचिमुख पक्ष्याचे घरटे मोडून टाकले.

**तात्पर्य :** मूर्खांना कधीही उपदेश करू नये. त्यांना केलेला उपदेश वाया जातो. उपदेश करणाऱ्यालाच त्रास होतो.

## टाइम मॅनेजमेंट

सुप्रिया पुजारी, लाइफ कोच, समुपदेशक

# स्टेजची भीती वाटते का ?



**रिया, आता सहावीत होती. तिला खूप वाटायचं की आपण नृत्य, नाटक किंवा गायन अशा कोणत्यातरी स्पर्धेमध्ये भाग घ्यावा. इतर मैत्रिणी अगदी सहज नृत्य करायच्या किंवा गाणे म्हणायच्या, पण रियाला स्टेजवर जाऊन अनेक लोकांसमोर काहीही सादर करताना भीती वाटायची.** स्टेजवर उभे राहून बोलायचं, या विचारानेच ती खूप घाबरायची. तिच्या मित्र- मैत्रिणींनी तिला खूप समजावले. त्यांचे ऐकून तिने एका वक्तृत्व स्पर्धेमध्ये भाग घेतला. दिवस-रात्र तिने आरशासमोर उभं राहून सराव केला. स्टेजवर पाऊल ठेवताच तिला भीती वाटली, पण शांतपणे डोळे मिटून तिने आपला सराव आठवला व खूप छान वक्तृत्व केले. प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून तिची प्रशंसा केली. या अनुभवामुळे रियाला एक गुरुकिल्ली मिळाली, ती म्हणजे सराव. आपल्यालाही स्टेजवर बोलायची भीती वाटू शकते. ती भीती घालविण्यासाठी काही टिप्स-

१. स्वतःवर विश्वास ठेवा. एखादी गोष्ट तुम्हाला नाहीच जमणार असा ग्रह करू नका.
२. कोणतेही नवीन कौशल्य आत्मसात करायला वेळ लागतो. त्यामुळे सहनशक्ती ठेवा.
३. सराव केल्याने आत्मविश्वास वाढतो. सराव करत राहा.
४. तुमच्या मते जे कोणी आदर्श आहेत त्यांचा सल्ला घ्या.

**लक्षात ठेवा :** कोणत्याही भीतीला पळवून लावायचे असेल तर त्याला सामोरे जाणे हाच मार्ग आहे.

# पर्यावरण समतोल राखणारी कांदळवने

## हाक वसुंधरेची

**मित्र-मैत्रिणींनो आज आपण एका वैशिष्ट्यपूर्ण भूरचनेची माहिती घेणार आहोत, त्याला कांदळवने म्हणतात. त्यांना खारफुटीची वने असेही संबोधतात.** उष्ण कटिबंधातील समुद्रकिनाऱ्यावर सागरी लाटांचा प्रभाव असणाऱ्या दलदलयुक्त प्रदेशात आणि नद्यांच्या मूखप्रदेशात आढळणाऱ्या सदाहरित लहान झुडपांना किंवा छोट्या वृक्षांना खारफुटी असे म्हणतात. समुद्रालगतच्या खाऱ्या पाण्यात साधारण भरतीच्या पातळीपासून ते ओहोटीच्या पातळीपर्यंतच्या पट्ट्यात ही वनस्पती आढळते. ती क्वचितच बारा मीटरपेक्षा जास्त उंच वाढते.

यांचे वैशिष्ट्य असे की खारफुटीच्या दाट झाडीमुळे समुद्र व जमीन तसेच खाडी किनारा व त्यातील प्रदेशांमध्ये एक हिरवी भिंत उभी राहते. त्यामुळे किनाऱ्याजवळच्या जमिनीची धूप थांबते. यादृष्टीने या वनस्पती महत्त्वाच्या आहेत. त्यांच्यामुळे इतर वनस्पती व जीवसृष्टीचे संरक्षण होते. जलचर प्राण्यांना संरक्षण मिळते. मासे, खेकडे, झिंगे वगैरे माशांच्या प्रजाती येथे अंडी घालतात. पिले मोठी झाली की समुद्राकडे जातात. या वनस्पतीसमूहात झिंगे अतिशय चांगले वाढतात. खारफुटीची वने असलेल्या सर्व ठिकाणी सागरी लाटांपासून संरक्षण मिळते. भारतात कांदळवने किंवा खारफुटीची वने नऊ राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशात आढळतात. त्यांचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ४९७५ चौरस किलोमीटर आहे. पश्चिम बंगाल आणि गुजरात या दोन राज्यात कांदळवने मोठ्या प्रमाणात पसरलेली असून अनुक्रमे २११२ आणि ११७७ चौरस किलोमीटर क्षेत्रावर आहेत. अंदमान निकोबार बेटे, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, ओरिसा, तमिळनाडू, गोवा, कर्नाटक, केरळ, दमण-दीव येथेही कांदळवने पसरलेली आहेत. पश्चिम बंगालमधील सुंदरबन, ओरिसातील भित्तरकनिका, आंध्र प्रदेशातील गोदावरी कृष्णेच्या त्रिभुज प्रदेशात आणि महाराष्ट्रातील ठाण्यात मोठ्या प्रमाणात खारफुटीची वने आहेत. पर्यावरण समतोल राखण्यात ही वने महत्त्वाची भूमिका निभावतात.

## योग जीवन

मनाली देव

# नीरालंब पद्म सर्वांगासन


**व्यवस्थित सराव झाल्यानंतर करण्याचे हे आसन आहे. त्यासाठी पद्मासन आणि सर्वांगासन हे उत्तम रीतीने जमणे आवश्यक आहे. पद्मासन घालून सर्वांगासनचे बरेच प्रकार आहेत त्यातलाच हा एक प्रकार.**

### असे करावे आसन

- प्रथम पाठीवर झोपावे. त्यानंतर दोन्ही पाय सावकाश जमिनीपासून वर उचलून सर्वांगासनच्या स्थितीमध्ये यावे.
- हाताने पाठीला आधार दिलेला असावा. आता हळूहळू पद्मासनची स्थिती घ्यावी.
- तोल सांभाळला गेला की पद्मासन हनुवटीच्या दिशेला घेण्याचा प्रयत्न करावा.
- या स्थितीमध्ये गुडघे जमिनीकडे असावे. मांडी, छाती पोटाला टेकलेली असावी.
- एकदा का तोल सांभाळला गेला, की दोन्ही हात सावकाश जमिनीवर टेकवावे.
- छायाचित्रात दाखविल्याप्रमाणे आसनस्थिती घेण्याचा प्रयत्न करावा.
- जेवढा वेळ आसनस्थितीमध्ये स्थिर राहता येईल, तेवढा वेळ स्थिर राहावे.
- आसन सोडताना उलट क्रमाने सावकाश आसन सोडावे व मत्स्यासन करावे.

### लाभ

- या आसनामध्ये गळ्यावर दाब येतो. जालंधर बंध बांधला जातो.
- डोळ्यांसाठी, चेहऱ्यावरील पिंपल्स कमी होण्यासाठी उपयोग होतो.
- आत्मविश्वास वाढवण्यासाठीसुद्धा मदत होते.
- रक्तप्रवाह उत्तम रीतीने सुरळीत होतो.
- पोटातील इंद्रियांचे कार्य सुधारते. खांदे अधिक सुदृढ होण्यास मदत होते.




**काळजी :**

- ज्यांना मानेचा त्रास आहे, चक्कर येण्याचा त्रास आहे, त्यांनी योग्य मार्गदर्शन घेणे आवश्यक आहे.
- झटका देऊन, खूप ओढून ताणून हे आसन करू नये.

## वाचू आनंदे

# जुळ्या मुलींच्या धाडसाची गोष्ट

आज प्रत्येक क्षेत्रात मुली पुढे आहेत. मुलांपेक्षा मुली कुठेच कमी नाहीत. हेच अधोरेखित करणारी गोष्ट म्हणजे 'कार्बन काप्यांची करामत.' तुम्हाला गोष्टीची पुस्तकं वाचण्याची आवड असेल तर हे पुस्तक तुम्ही वाचायलाच हवे. या पुस्तकात एकसारख्या दिसणाऱ्या दोन मुलींची सुंदर गोष्ट आहे. "कार्बन कॉपियों की करामत" हे या पुस्तकाचे मूळ हिंदी स्वरूप. या पुस्तकाला अकादमी पुरस्कार मिळालेला आहे. सुरेखा पाणंदीकर यांनी या पुस्तकाचे मराठी भाषांतर केले असून हे पुस्तक बालवाचकांच्या पसंतीस उतरते आहे. आशा व उषा या एकसारख्या दिसणाऱ्या जुळ्या बहिणी. आपल्या धैर्याने, चतुराईने आपण मुलांपेक्षा कुठल्याही बाबतीत कमी नाही हे त्या आपल्या आजीला दाखवून देतात. परिणामी धटिंगण वाटणाऱ्या या 'कार्बन कॉप्या' आजीच्याही लाडक्या होऊन जातात. पण, आशा आणि उषा असं कोणतं धाडस करतात? कोणत्या संकटांचा सामना करतात, कुठे चतुराई दाखवतात? हे जाणून घेण्यासाठी 'कार्बन कॉप्यांची करामत' हे पुस्तक वाचायला हवे. गोपाळ नांदुरकर यांनी काढलेल्या चित्रांमुळे या पुस्तकाची रंगत आणखी वाढली आहे.




? ८) पहिल्या व्यावसायिक दूरध्वनी सेवेची सुरुवात कधी झाली?

✔ २) सूर्यप्रकाश हा अपारंपरिक ऊर्जेचा स्रोत आहे.

# घरच्या घरी प्रयोगशाळा...!

— अशोक तातुगडे

मित्र-मैत्रिणींनो, आता सुट्टी संपत आली आहे. या आठवड्यातच शाळा सुरू होतील. तुम्ही सुट्टीमध्ये केलेल्या काही प्रयोगांची माहिती आपल्या वर्गमित्रांना आणि शिक्षकांना आवर्जून द्या. आपल्या नवीन इयत्तेतील विज्ञानाच्या पुस्तकांमध्ये कुठले कुठले प्रयोग आहेत, तेही बघा. नेहमीप्रमाणे आजही आपण दोन नवीन प्रयोगांची माहिती घेणार आहोत. यापैकी पहिल्या प्रयोगात उष्णता आणि विरघळणे यांचा काय संबंध आहे? हे जाणून घेणार आहोत, तर दुसऱ्या प्रयोगात आपण चुंबकत्वाचे तत्त्व शिकणार आहोत. चला तर, हे दोन्ही प्रयोग करून पाहूया.





## उष्णतेचा विरघळण्यावर परिणाम

मित्र-मैत्रिणींनो, पदार्थांच्या काही गुणधर्मांचा आपण रोजच्या जीवनामध्ये उपयोग करून घेत असतो. उदा. कपडे धुताना गरम पाणी वापरणे. आता उष्णता आणि विरघळणे यांचा काय संबंध आहे? ते आपण आजच्या प्रयोगातून शिकणार आहोत. तुम्ही हा प्रयोग तुमच्या मित्रांसोबत करून बघा आणि त्यातून नेमकी कोणती निरीक्षणे समोर येतात, याची नोंद घ्या.

**साहित्य :** काचेचे दोन मोठे ग्लास, साखर, थंड पाणी, गरम पाणी, चमचा.

**कृती :** प्रथम एका ग्लासामध्ये थंड पाणी घ्या आणि त्यात एक चमचा साखर टाका. साखर पूर्णपणे विरघळेपर्यंत चमच्याने ढवळत रहा. साखर टाकत रहा आणि ती विरघळत राहील असे बघा. काही वेळाने आपल्या लक्षात येईल की, पाण्यात साखर विरघळणे बंद होईल. साखर तशीच तरंगत राहील. तो कितवा चमचा होता त्याची नोंद ठेवा. आता दुसऱ्या ग्लासमध्ये तेवढेच गरम पाणी घ्या त्यातही चमच्याने साखर टाकून ती ढवळत राहा. गरम पाण्यामध्ये साखर विरघळणे कधी थांबले, म्हणजे त्यात किती चमचे साखर टाकली, तेव्हा विरघळणे थांबले, याची नोंद ठेवा.

**निरीक्षण व निष्कर्ष :** गार पाण्यात किती चमचे साखर टाकल्यावर साखर विरघळणे थांबले आणि गरम पाण्यात किती चमचे साखर विरघळली यांच्या नोंदी तपासल्यावर लक्षात येते की, गरम पाण्यात जास्त प्रमाणात साखर विरघळते, म्हणजे जास्त चमचे साखर विरघळते. असे का होते? कुठल्याही द्रव पदार्थात किती प्रमाणात एखादा घनपदार्थ विरघळू शकेल याची एक मर्यादा असते. गरम पाण्यात ही मर्यादा वाढते. गरम पाण्याचे रेणू हे जास्त गतीने हालचाल करीत असतात आणि एकमेकांपासून जास्त दूर फेकले जातात. त्यामुळे गरम पाण्याच्या दोन रेणूंमध्ये जास्त जागा निर्माण होते. त्यामुळे जास्त साखरचे रेणू सामावले जातात. त्यामुळेच साखर जास्त प्रमाणात विरघळू शकते.





## तरंगणारी पेपर क्लिप

मित्र-मैत्रिणींनो, या प्रयोगात आपण चुंबकत्वाचे तत्व शिकणार आहोत. चुंबकत्वाचा उपयोग आपण दैनंदिन जीवनात अनेक ठिकाणी करत असतो. त्यातला एक म्हणजे फ्रीज वर लावलेली चुंबकातून तयार केलेली छोटी छोटी खेळणी. याद्वारे आपण चुंबकत्व शिकणार आहोत. तुम्ही हा प्रयोग तुमच्या मित्रांसोबत करून बघा आणि त्यातून नेमकी कोणती निरीक्षणे समोर येतात, याची नोंद घ्या.

**साहित्य :** थोडेसे मोठे तोंड असलेली व धातूचे झाकण असलेली काचेची स्वच्छ बरणी, दोरा, चुंबक, पेपर क्लिप, डिंक, कात्री इत्यादी.

**कृती :** बरणीच्या झाकणाच्या आतल्या बाजूने मधोमध चुंबक डिंकाच्या मदतीने चिकटवून घ्या. त्यानंतर 'पेपर क्लीप'ला एका बाजूने दोऱ्याची गाठ मारा. दोऱ्याचे दुसरे टोक सेलो टेपने बाटलीच्या तळात चिकटवून ठेवा. आता बाटलीला झाकण लावा आणि ती उलटी करा. आत असलेली पेपर क्लिप आता दोऱ्याने खाली लटकलेली दिसेल. आता बाटली पुन्हा सुलटी करा, म्हणजेच झाकण वर आणि तळ खाली अशा स्थितीत ठेवा.

**निरीक्षण व निष्कर्ष :** पेपर क्लीप आता बाटलीत हवेत तरंगताना दिसेल. असे होण्याचे कारण म्हणजे झाकणाच्या आतील बाजूस असलेले चुंबक पेपर क्लिपला खेचून घेण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, ती क्लिप चुंबकापर्यंत जाऊ शकली नाही कारण ती तळाशी दोऱ्याने बांधलेली आहे आणि तो दोरा पुरेसा लांब नाही. त्यामुळे क्लिप चुंबकापर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे ती मध्येच हवेत तरंगते आहे असे दिसते. झाकणाच्या आतल्या बाजूला असल्यामुळे चुंबक दिसत नाही आणि क्लिपचे तरंगणे पाहणाऱ्याला ती जादूच वाटते.



खेळ खेळूयात

## सावध कोंबडा

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

**कृती एक :**

- यामध्ये खेळाडूंचे २ गट करून घ्यावेत.
- कोनवर चेंडू ठेवून दोन्ही गटाच्या खेळाडूंनी एकत्र गुडघ्यात वाकून (squat) उभे रहावे. आणि साधारण १० पावलांवर गटातील उरलेले खेळाडू समोर दोन्ही बाजूंना उभे राहतात.
- गटनायकाने त्यांना सूचना द्यायच्या. यात दोन्ही हाताने डोक्याला, खांद्याला, कमरेला, गुडघ्याला, टाचेला अशा क्रम बदलत वेगाने स्पर्श करण्याच्या सूचना द्यायच्या आणि त्यातच 'बॉल' असे म्हणताच जो खेळाडू पटकन बॉल उचलेल त्याने आडवे पळत जाऊन आपल्या गटातील खेळाडूला तो बॉल खाली न पाडता हातात नेऊन द्यावा.
- नंतर त्या खेळाडूने पटकन बॉल सुरुवातीच्या जागी आणून ठेवावा.

**हाच खेळ साखळी पद्धतीनेदेखील सुरू ठेवता येतो.**

**कृती दोन :**

हाच खेळ दोन्ही गटाचे खेळाडू एकत्र गोलात गुडघ्यात वाकून उभे राहून खेळता येतो. जो गट जास्त वेळा अचूकपणे बॉल उचलेल तो गट जिंकतो.

**कौशल्ये:**

- हा चपळता आणि सावधपणा अंगिकारण्याचा खेळ आहे. या खेळात पायांची ताकद वाढते.
- आडवे पळणे, गोलावर पळणे यांमुळे वेग आणि तोल सुधारतो.
- एकाग्रता वाढते. हात, पाय, डोळे यांतील समन्वय वाढतो.
- हा खेळ सर्व खेळांसाठी पूरक आहे.

**दोस्तांनो, काजू, बदाम, पिस्ते यांची माहिती आपण घेतली. याच यादीतील पुढचे नाव म्हणजे अंजीर! वड, पिंपळ, उंबर या वनस्पतींच्या मोरेसी कुलातील अंजीर हा वृक्ष असून, याचे शास्त्रीय नाव 'फायकस कॅरिका' असे आहे. हा पानझडी वृक्ष मूळचा भूमध्य सामुद्रिक प्रदेशातील आहे. जाणून घेऊया या वृक्षाबद्दल...**

## पोषणमूल्यांचा स्रोत अंजीर



**प्रकार :** अंजिराचे चार प्रकार आहेत. पहिल्या प्रकारात युरोपातील 'सामान्य' प्रकार येतो. यामध्ये (परागकणाशिवाय होणारे) बिया नसलेले फळ वर्षातून दोनदा बनते. दुसरा 'स्मर्ना' प्रकार अतिशय उत्तम फळ तयार करणारा आहे. तिसरा 'रानटी' प्रकार आहे. 'सान पेद्रो' या चौथ्या प्रकारच्या अंजिराची लागवड कॅलिफोर्नियात केली जाते. याला वर्षांतून दोनदा बहार येतो.

### झाडाची माहिती

अंजीर या वृक्षाची उंची सुमारे ३-१० मी. पर्यंत असते. त्याच्या फांद्या मऊ आणि राखाडी रंगाच्या असतात. पाने सुमारे १२ ते २५ सेंटिमीटर लांब आणि सुमारे १०-१८ सेंटिमीटर रुंद असून, ती हृदयाकृती, किंचित खंडित व दातेरी असतात. अंजिराचे फळ ३-५ सेंमी. लांब असून, प्रत्यक्षात तो फुलांचा गुच्छ आहे. फळ तयार होताना आधीचा हिरवा रंग जाऊन तो 'अंजिरी' होतो. त्यालाच अंजीर असे म्हटले जाते.

### लागवड

अंजिराचे पोर्तुगाल, इटली, ग्रीस, अफगाणिस्तान, इराण, टर्की हे महत्त्वाचे उत्पादक देश आहेत. भारतात कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडू या राज्यात अंजिराची लागवड केली जाते. पिकलेली ताजी अंजिरे रुचकर असतात. सुकविलेली गोड फळे, तसेच त्यांचा मुरंबा खाल्ला जातो. पूर्ण पिकून गळून पडलेल्या अंजिरापासून खाण्यासाठी सुकी अंजिरे तयार करतात. सुके अंजीर बरेच दिवस टिकते. ती इराण, अफगाणिस्तान आणि ग्रीसमधून भारतात आयात केली जातात. भारतातही थोड्या प्रमाणावर सुकी अंजिरे बनवितात. सुक्या अंजिरांची प्रतवारी त्यांच्या रंगावरून आणि आकारावरून ठरवितात. काजू, संत्री या फळांच्या बर्फीप्रमाणे अंजिराची बर्फीही बाजारात मिळते.

### औषधी गुणधर्म


- अंजिराचे पोषणमूल्य उच्च प्रकारचे असते. त्यापासून कॅल्शिअम मिळते. तसेच, यात फॉस्फरस, पोटॅशियम, बीटा कॅरेटीन (अ-जीवनसत्त्व) आणि क जीवनसत्त्व असते. इतर कोणत्याही फळापेक्षा अंजिरात तंतूमय पदार्थ अधिक प्रमाणात असतात.
- अंजीर विरेचक असून त्यात मोठ्या प्रमाणात प्रतिऑक्सिडीकारके असतात. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते, तसेच हृदयाचे आरोग्य राखण्यासदेखील मदत होते.





? १) कपडे धुताना गरम पाणी वापरणे यात कोणत्या तत्त्वाचा वापर केला जातो?

✔ ५) मुलानवर पहिला चित्रपट १९९८ मध्ये काढला गेला.

कोणत्या सरड्याची जीभ किड्यापर्यंत पोहोचली आहे शोधा बरं.



खालील चित्रामध्ये एकुण किती मासे आहेत ?



चित्र रंगवा




डोकं चालवा, गणित सोडवा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ☐ | + | ☐ | + | ☐ | = 16 | |
| + | | + | | + | | |
| ☐ | + | 7 | + | ☐ | = 16 | |
| + | | + | | + | | |
| ☐ | + | ☐ | + | ☐ | = 16 | |
| = | | = | | = | | |
| 16 | | 16 | | 16 | | |


फुलपाखराची नेमकी सावली ओळखा



खालील चित्रांमधील सहा फरक शोधा.



डोकं चालवा, गणित सोडवा.



# बुद्धिमान आणि देखणा पोपट मकाव

मिठू मिठू बोलणारा पोपट तर आपण सर्वांनीच पाहिलेला असतो. याच पोपटाचे परदेशी पाहुणे म्हणजे मकाव पक्षी. लाल, पिवळ्या, हिरव्या, निळ्या रंगातले पोपटाचे हे पाहुणे भलतेच देखणे असतात. दिसायला रुबाबदार आणि भल्या मोठ्या आकाराच्या या पक्ष्यांचे सर्वांनाच मोठं कुतूहल असतं. असं काय आहे या मकावमध्ये की साऱ्या जगालाच त्याचं आकर्षण वाटतं हेच आपण जाणून घेणार आहोत.

## दीड लाख रुपये किंमत

मकाव पक्ष्याला श्रीमंतांचा पोपट म्हटलं जातं. कारण तो विकत आणायचा असेल तर आजघडीला त्याची किंमत दीड लाख रुपयापर्यंत जाते. अर्थात, मकावच्या अनेक प्रजाती आणि रंगसंगती असल्याने कमीअधिक किमतीलाही ते विकले जातात. मुळात जंगल हेच मकाव पक्ष्यांचे घर असल्याने त्यांना विकून पिंजऱ्यात कोंडणे चूकच आहे. मात्र, तरीही मकावची विक्री होत असताना पाहायला मिळते. कुत्रा किंवा मांजरांपेक्षा मकाव जास्त चपळ असल्याचे म्हटले जाते. शिवाय सर्वांत बौद्धिक पोपट प्रजातींपैकी एक असल्यामुळे मकाव जगभरातील पक्षीप्रेमींच्या पसंतीस पडतो.

## तीन फुटांचा पक्षी

पोपटाचा आकार एक ते दोन फुटापर्यंत असतो. पण, या पोपटाचे परदेशी पाहुणे तब्बल तीन फूट आकाराचे असतात बरं का. भलीमोठी शेपटी, मोठ्या आकाराचे डोके आणि बळकट पायांचा मकाव पोपट रंगीबेरंगी पिसांसाठी प्रसिद्ध आहे. काही मकाव पोपट एकाच रंगाचे असतात तर काही दोन रंगांचे, तीन रंगांचे तर काही थेट सप्तरंगीही असतात. मकाव पोपट आकाराने मोठे असले तरी त्यांचं वजन जास्तीत जास्त दोन किलोच असतं बरं का.



रंग : लाल, हिरवा, निळा आणि पिवळा



## मकावच्या वेगवेगळ्या प्रजाती

- ब्लू गोल्ड
- ब्लू थ्रोटेड
- ग्रीन विंग
- हॅकिंथ
- मिलिटरी
- रेड फ्रंट हेड
- पॅराकीट्स,
- कॉकॅटियल
- कोकाटू

## अमेरिकन बर्ड

मकाव पोपट हा उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतील उष्णकटिबंधीय भागातील रहिवासी. तो फार जुन्या काळापासून अस्तित्वात आहे. मध्य आणि दक्षिण अमेरिकेच्या जंगलात मकाव सर्रास आढळतात. घनदाट जंगलात त्यांचे अधिकाधिक वास्तव्य पाहायला मिळते. लाकूडतोड करताना काही लाकूडतोड्यांच्या नजरेस हे मकाव पोपट पडले आणि त्यानंतर या पोपटाला जगभरातून मागणी वाढू लागली. अलीकडे जंगलतोडीमुळे मकावच्या अनेक जाती लुप्त झाल्या आहेत.

**लांबी :** ९० ते १०० सेंटीमीटर

**वजन :** दीड ते दोन किलो | **आयुष्य :** ४५ ते ५० वर्षे

# फुलांचा राजा गुलाब

दोस्तांनो, फळांची आणि वाद्यांची माहिती आपण घेतली. आता आपण काही महत्त्वाच्या फुलांची माहिती जाणून घेणार आहोत. फुलांच्या यादीत गुलाबाचा नंबर सगळ्यात वर लागतो. त्याला फुलांचा राजा असेही म्हटले जाते. विविध रंगातला डौलदार गुलाब पाहताना मन प्रसन्न होतं. त्यापासून अत्तर, सुगंधित पाणी, गुलकंद, आइस्क्रीम अशा विविध गोष्टी तयार केल्या जातात. चला तर, जाणून घेऊया या सुगंधी फुलाबद्दल...

## शास्त्रीय माहिती

फुलांचा राजा म्हणून सर्वांना माहीत असलेले गुलाब हे सदापर्णी झुडूप आहे. रोजेसी कुलातील रोझा प्रजातीमधील ही वनस्पती आहे. जगभर गुलाबाच्या १५० हून अधिक जाती असून, फुले विविध रंगांत आढळतात. गुलाबाच्या काही जाती वेलींच्या स्वरूपात आढळतात. बहुतेक जाती मूळच्या आशियातील असून, काही जाती यूरोप, उत्तर अमेरिका आणि उत्तर आफ्रिका येथील आहेत.

## बहुउपयोगी फूल

- गुलाब ही वनस्पती तिच्या फुलांसाठी प्रसिद्ध आहे. बागांची शोभा वाढविण्यासाठी आणि फुलदाणी, पुष्पगुच्छ व हार तयार करण्यासाठी याची लागवड केली जाते.
- गुलाबाच्या पाकळ्यांत बाष्पनशील तेल असते. त्यापासून अत्तर तयार करतात. या तेलात फिनिल एथिल अल्कोहॉल, जिरॅनिऑल, नेरॉल आणि सिट्रोनेलॉल हे प्रमुख घटक असतात. तेल मिळविण्यासाठी पाकळ्यांमधून वाफ सोडतात. तेल काढून घेऊन मागे उरलेले पाणी गुलाबपाणी म्हणून वापरतात.
- गुलाबाचे अत्तर मुख्यत: बसरा, एडवर्ड व दमास्क या प्रकारांच्या पाकळ्यांपासून मिळवितात.
- गुलाबाची कळी, फुले आणि पाकळ्या यांपासून आयुर्वेदिक व युनानी औषधे तयार करतात, तसेच पाकळ्या साखरेच्या पाकात मुरवून गुलकंदाच्या स्वरूपात खाल्ल्या जातात.



यूरोप आणि अमेरिकेत शोभिवंत गुलाबांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. तेथे गुलाबाच्या फार मोठ्या बागा आहेत. यासाठी संकर पद्धतीने गुलाबांचे अनेक प्रकार निर्माण केले आहेत.

## तुम्हाला माहीत आहे का?

१. रानटी गुलाबाच्या फुलाला पाच पाकळ्या असतात. या गुलाबापासून सध्याचे अनेक पाकळ्या असलेले व विविध रंगांचे गुलाब तयार करण्यात आले आहेत. सौंदर्य आणि सुगंधासाठी जगभर त्यांची लागवड केली जाते.

२. भारतात जगभरातील गुलाबांच्या विविध जाती व त्यांचे प्रकार उपलब्ध करून त्यांची लागवड करण्याचे प्रयत्न चालू आहेत. बेंगळुरू, मुंबई, कोलकाता, इंदूर, चंडीगड, दिल्ली, पुणे, कुलू व सिमला या ठिकाणी गुलाबांच्या बागा आहेत.

## झाडाची माहिती

गुलाबाचे झुडूप आकाराने लहान व उंचीने १-२ मी. वाढते. खोडावर व फांद्यांवर तीक्ष्ण व मागे वाकलेले काटे असतात. पाने संयुक्त, एकाआड एक व पिसांसारखी असतात. पर्णिका ३-७, अंडाकार व दातेरी असतात. फुलांच्या रंगांत विविधता आढळते. स्वच्छ पांढऱ्या रंगापासून गुलाबी छटा, नारिंगी, फिकट ते गडद लाल, किरमिजी, शेंदरी, गडद निळ्यापर्यंत फुलांचे रंग असतात. फुलांचे आकारमान २-८ सेंमी. असते. अर्धवट उमललेल्या कळ्या आकर्षक दिसतात. ज्या फांदीवर फुले येतात, ती फांदी फुलांचा भार पेलण्याएवढी मजबूत असते. रानटी गुलाबाला तयार होणारी फळे लाल आणि बोरांसारखी गोल व फुगीर असतात. त्यांत बिया असतात.

## प्रकार

गुलाबाची लागवड करताना माती, खत, पाणी व सूर्यप्रकाश आणि त्याचप्रमाणे कलमे, छाटणी इ. बाबी काळजीपूर्वक निवडाव्या लागतात. गुलाबाला अतिथंड हवा मानवत नाही. लागवडीनुसार गुलाबाचे दोन प्रकार पडतात. पहिल्या वर्गात उन्हाळी गुलाब येतात. ते वर्षातून फक्त एकदाच फुलतात. दमास्क, वेली गुलाब इ. याचे प्रकार आहेत. दुसऱ्या वर्गात बारमाही गुलाब येत असून, ते नाजूक असतात. कस्तुरी, चिनी व संकरित टी हे याचे काही प्रकार आहेत. संकरित टी गुलाबाच्या कळ्या टोकदार असून, फुलांना नुकत्याच उघडलेल्या खोक्यातील चहासारखा वास येतो, म्हणून त्यांना 'टी रोजेस' म्हणतात.

• Registered • Date of Publication : शुक्रवार, १४ जून २०२४ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.



दोस्तांनो, जून महिना अनेक कारणांमुळे इतर महिन्यांपेक्षा वेगळा ठरतो. तुम्हा मुलांची शाळा जूनमध्ये सुरू होते, आपल्यापैकी अनेकांचा आवडता ऋतू पावसाळा जूनमध्ये सुरू होतो, वर्षातील सर्वांत मोठा दिवस म्हणजेच २१ जून हाही याच महिन्यात येतो. अशा अनेक गंमतीजंमती याच महिन्यात घडतात. ज्यांना आपली जन्मतारीख आठवत नाही अशा मंडळींची तारीख शाळेत १ जून हीच घातली जाते. जाणून घेऊया या अतरंगी महिन्याबाबत...




## नावाची गंमत

जून हे नाव लॅटिन शब्द 'ज्युनिअस'चे आधुनिक काळातील रूपांतर आहे. जून महिन्याचे नाव कसे पडले? याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या जातात. त्यानुसार एक सिद्धांत असा आहे की, या महिन्याचे नाव रोमन देवी 'जुनो' हिच्या नावावरून ठेवण्यात आले आहे, तर लॅटिन शब्द 'ज्युनिअस'वरूनही या महिन्याचे नाव तयार झाले असे म्हटले जाते. या शब्दाचा अर्थ 'लहान लोक' असा होतो. आणखी एक शक्यता अशीही वर्तवली जाते की, रोमन प्रजासत्ताकाचे संस्थापक लुसियस जुनियस ब्रुटस यांच्या नावावरून या महिन्याचे नाव ठेवण्यात आले आहे.

## जूनचा वार इतरांचा नाही

संपूर्ण वर्षात जून महिना ज्या दिवशी सुरू होतो, त्या दिवशी जो वार असतो, तो वार इतर कोणत्याही महिन्यांच्या एक तारखेला नसतो. उदा. या वर्षी १ जूनला शनिवार आला आहे, तर इतर कोणत्याच महिन्यांच्या एक तारखेला शनिवार आलेला नाही. बघा, तुम्हीही तपासून की, हे खरंच आहे का?

## महत्त्वाचे दिवस

जून महिन्यात अनेक महत्त्वाचे दिवस येतात. त्यामुळे बऱ्याचदा सुट्टीही मिळते. जून महिन्यात जागतिक पर्यावरण दिन, फादर्स डे, आंतरराष्ट्रीय योग दिवस आणि जागतिक महासागर दिन यांसारख्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर साजरे होणारे महत्त्वाचे दिवस येतात.

## आधी चौथा, आता सहावा महिना

फार पूर्वी जून हा वर्षातील चौथा महिना असायचा. ज्युलियस सीझर सत्तेवर येण्यापूर्वी, कॅलेंडर केवळ १० महिन्यांचे होते. इ. स. पूर्व ४६ मध्ये त्याने वर्षात आणखी दोन महिने जोडून 'ज्युलियन कॅलेंडर' तयार केले. यामध्ये जून सहावा महिना झाला.

## जून नावाचा कीटक

जून हा एकमेव महिना असा आहे की, त्याच्या नावाचे कीटकही आढळतात. त्यांना 'जून बीटल' किंवा 'जून बग' असे म्हटले जाते. हे कीटक सामान्यतः मे आणि जून महिन्यातच अमेरिकेत आढळतात.

## वर्षातील लहान-मोठा

जून या एकाच महिन्यात वर्षातील लहान आणि मोठा दिवस येतो. तुम्ही कुठे आहात? यावर ते ठरते. तुम्ही उत्तर गोलार्धात राहात असाल, तर तुमच्यासाठी २१ जून हा वर्षातील सर्वांत मोठा दिवस असतो. तुम्ही दक्षिण गोलार्धात असाल, तर हाच दिवस वर्षातील सर्वांत लहान दिवस ठरतो.

## टेनिस चाहत्यांसाठी...

तुम्ही टेनिसचे चाहते असाल, तर तुमच्यासाठी जून हा खूप महत्त्वाचा महिना आहे. कारण, याच महिन्यात विम्बल्डन टेनिस स्पर्धा घेतल्या जातात. यामुळे टेनिसप्रेमींचा उत्साह शिगेला पोहोचलेला असतो.



## ध्वजदिन

असे अनेक देश आहेत की, जे जून महिन्यात त्यांचा ध्वजदिन साजरा करतात. स्वीडन ६ जून रोजी ध्वजदिन साजरा करतो. संयुक्त राष्ट्रे १४ जून रोजी त्यांचा ध्वज दिवस साजरा करतात आणि डेन्मार्कमध्ये १५ जूनला ध्वजदिन साजरा केला जातो.

## गुलाबांचा बहर

जून महिन्यात जी फुले येतात त्यात प्रामुख्याने गुलाबांचा क्रमांक लागतो. गुलाब हे प्रेम, इच्छा, औदार्य आणि आपुलकीचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे या महिन्यात जन्मलेल्या व्यक्तीदेखील याच स्वभावाच्या असतात, असे म्हटले जाते.

## नव्याची नवलाई

आपल्यासाठी सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे, जून महिन्यात शाळा सुरू होते. नवा वर्ग, नवे शिक्षक, नव्या वह्या-पुस्तके, नवी माहिती अगदी नवीन दप्तर-डबासुद्धा... त्यामुळे हा महिना नवनवीन गोष्टींचा असतो. या महिन्यात तुम्ही अशा अनेक नवीन गोष्टींचा अनुभव घ्या आणि पुढचे पूर्ण वर्ष छान मजेत घालवा.

